# वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय विरार (पुर्व), जि. पालघर पिन नं** 401305
**दुरध्वनी** – 0250-2525101/02/03/04/05/06, **फॅक्स** – 0250-2525107
**ई-मेल** vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** 1338 **विभाग : मुख्यालय लेखा विभाग**
**दिनांक :** 23/3/2022

**ठरावाचा विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 96 व 100 अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेचे अ व क अंदाजपत्रकाचे सन सन 2021-22 चे सुधारीत व सन 2022-23 चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज मा. प्रशासक यांनी विचारात घेऊन स्विकृतीबाबत निर्णय घेणे.

**ठरावाचा मजकुर :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 96 व 100 मधील तरतुदीप्रमाणे सन 2021-22 च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन 2022-23 चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक अंतिमरित्या स्विकृतीसाठी दि. 16/3/2022 रोजी मा. आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका यांचे वतीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी मा. प्रशासक याना सादर केले.

सदर अर्थसंकल्पामध्ये पी बजेट चे अंदाज, जेंण्डर बजेटचे अंदाज व दिव्यांग कल्याण योजनांचे अंदाज यासह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी, क अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी/ अमृत योजना, विशेष निधी योजना अर्थसंकल्प ई. चा समावेश आहे.

सदर अंदाज व मागण्यांवर दि. 16/3/2022 ते दि. 23/3/2022 या कालावधीत सर्व विभाग व मा. लोकप्रतिनिधी यांचेशी सविस्तर चर्चा व विचार घेऊन अंतिमरित्या स्विकृती साठी सादर करण्याबाबत मा.प्रशासक महोदयांनी निर्देश दिले आहेत.

त्यानुसार एकूण 896 लेखाशिर्षापैकी 16 लेखाशिर्षामधील अर्थसंकल्पीय तरतुदी मध्ये (+) किंवा (-) बदल झाले आहे. त्यानुसार अर्थसंकल्पीय पुस्तिकेमध्ये यथायोग्य बदल करण्यात आले आहेत. इतर लेखाशिर्षामध्ये कोणताही बदल प्रस्तावित नाही.

वसई विरार शहर महानगरपालिकेचे सन 2021-22 चे सुधारीत व सन 2022-23 मुळ अंदाजपत्रक योग्य त्या दुरुस्तीसह मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सादर,

**ठरावाचा निर्णय :-** मागासवर्गिय कल्याणकारी योजनांसह पी बजेट, जेण्डर बजेट व दिव्यांग कल्याणाचे बजेटसह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी क अर्थसंकल्प, , वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी/ अमृत योजना /विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबतचे सन 2021-22 चे सुधारीत व सन 2022-23 चे मुळ अंदाज तयार करतांना दि. 16/3/2022 ते दि. 23/3/2022 या कालावधीत सर्व विभाग व मा. लोकप्रतिनिधी यांचेशी सविस्तर चर्चा व विचार विमर्ष केला असता त्यांनी प्रपत्र एक मध्ये नमुद केल्याप्रमाणे फेरबदल करण्याबाबत शिफारशी केल्या आहेत. सदर प्रपत्र एक मधील शिफारसी स्विकृत करण्यात येत असून तद्नंतर होणारा अर्थसंकल्पीय गोषवारा खालील प्रमाणे असेल.

# अर्थसंकल्पीय गोषवारा

(रु. लाखात)

| लेखाशिर्ष | सुधारीत अर्थसंकल्प सन 2021-22 | मुळ अर्थसंकल्प सन 2022-23 |
|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | 86116.82 | 71595.33 |
| महसुली जमा | 110900.31 | 123385.00 |
| भांडवली जमा | 11138.81 | 17229.58 |
| असाधारण व ऋण निलंबन जमा | 20163.23 | 23257.12 |
| एकत्रित जमा रकमा | 142202.35 | 163871.70 |
| प्रारंभिक शिल्लकेसह एकत्रित जमा रक्कम | 228319.16 | 235467.03 |
| महसुली खर्च | 83382.00 | 108468.77 |
| भांडवली खर्च | 54469.62 | 105412.68 |
| असाधारण व ऋण निलंबन खर्च | 18872.22 | 21442.83 |
| एकत्रित खर्च रकमा | 156723.84 | 235324.28 |
| अखेर शिल्लक रकमा | 71595.33 | 142.75 |
| अखेरच्या शिलकेसह एकत्रित खर्च रक्कम | 228319.16 | 235467.03 |

अर्थसंकल्पीय गोषवाऱ्यात व अर्थसंकल्पीय पुस्तिकेतील शेवटच्या स्तंभात नमुद केलेले अर्थसंकल्पीय अंदाज अंतिमरित्या स्विकृत करण्यांत येत आहेत. त्याप्रमाणे अर्थसंकल्पीय पुस्तीकेत सोबतच्या प्रपत्र एक मध्ये नमुद लेखाशिर्ष निहाय नमूद केल्याप्रमाणे योग्य ते बदल करुन अर्थसंकल्पीय पुस्तीका पुढील कार्यवाहीसाठी सर्व विभागांना वितरीत करण्यास व प्रसिध्द करण्यास या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

सर्व विभागाच्या विभागप्रमुखांनी त्यांचेकडे सुपूर्द करण्यात आलेल्या तरतूदींशी सबंधीत लेखाशिर्षाचे जमा / खर्चावर प्रभावी नियंत्रण ठेवावे; व मासीक/ त्रैमासिक जमा खर्च अहवाल /लेखे लेखासंहितेमध्ये नमूद केलेल्या तरतूदींचे पालन करुन विहीत वेळेत मुख्यालय लेखा विभागास सादर करावेत. असे निर्देश या ठरावाद्वारे देण्यात येत आहेत.

(अनिलकुमार पवार)<br>प्रशासक<br>वसई विरार शहर महानगरपालिका

## प्रपत्र एक

| | |
|---|---|
| 1 | मालमत्ता कर सन 2022-23 रु. 201 कोटी 45 हजार तरतुदी ऐवजी रु. 211 कोटी 45 हजार करण्यात आली आहे. |
| 2 | सहाय्यक अधिमुल्य (Ancillary Premium) सन 2021-22 रु. 30 लक्ष तरतुदी ऐवजी रु. 1 कोटी तसेच सन 2022-23 रु. 50 लक्ष तरतुदी ऐवजी रु. 2 कोटी करण्यात आली आहे. |
| 3 | सा.प्र. फर्निचर / वॉटर कुलर सन 2021-22 रु. 50 लक्ष तरतुदी ऐवजी रु. 1 कोटी करण्यात आली आहे. |
| 4 | सा.प्र. अतिथ्य खर्च सन 2021-22 रु. 50 हजार तरतुदी ऐवजी रु. 7 लक्ष तसेच सन 2022-23 रु. 12 लक्ष तरतुदी ऐवजी रु. 25 लक्ष करण्यात आली आहे. |
| 5 | न.र.वि. छपाई / स्टेशनरी खर्च सन 2021-22 रु. 12 लक्ष तरतुदी ऐवजी रु. 21 लक्ष करण्यात आली आहे. |
| 6 | न.र.वि. दावे खटले खर्च सन 2022-23 रु. 25 लक्ष तरतुदी ऐवजी रु. 2.50 कोटी करण्यात आली आहे. |
| 7 | न.र.वि. सहाय्यक अधिमुल्य (Ancillary Premium) खर्च सन 2021-22 रु. 15 लक्ष तरतुदी ऐवजी रु. 50 लक्ष तसेच सन 2022-23 रु. 25 लक्ष तरतुदी ऐवजी रु. 1 कोटी करण्यात आली आहे. |
| 8 | दिवाबत्ती विभाग पोल स्थलांतर/ सर्किट लाईट व्यवस्था सन 2022-23 रु. 5.50 कोटी तरतुदी ऐवजी रु. 5 कोटी करण्यात आली आहे. |
| 9 | त्रयस्थ पक्षीय तपासणी खर्च सन 2022-23 रु. 1.5 कोटी तरतुदी ऐवजी रु. 2 कोटी करण्यात आली आहे. |
| 10 | विकास विषयक कामांसाठी राखीव निधी (निरी/आय.आय.टी या तांत्रिक तज्ञ संस्थे मार्फत पुर प्रतिबंधक कामे होल्डींग पॉन्डस व इतर कामे) सन 2022-23 रु. 10 कोटी तरतुदी ऐवजी रु. 20 कोटी करण्यात आली आहे. |
| 11 | दिव्यांग विशेष व्यक्तींसाठी कल्याणकारी योजना व योजना राबवणाऱ्या संस्थांसाठी योजनांतर्गत वित्तीय सहाय्य सन 2021-22 रु. 4.5 कोटी तरतुदी ऐवजी रु. 6 कोटी करण्यात आली आहे. |
| 12 | पाणी पुरवठा वितरण व्यवस्था दैनंदिन देखभालीसाठी साहित्य खरेदी सन 2021-22 रु. 3 कोटी 90 लक्ष 2 हजार तरतुदी ऐवजी रु. 5 कोटी करण्यात आली आहे. |
| 13 | उसगाव योजना जनित्र डिझेल सन 2021-22 रु. 89.96 लक्ष तरतुदी ऐवजी रु. 1.05 कोटी करण्यात आली आहे. |
| 14 | सुर्या योजना पाण्याचे देयक सन 2021-22 रु. 5 कोटी 29 लक्ष 3 हजार तरतुदी ऐवजी रु. 6.75 कोटी करण्यात आली आहे. |
| 15 | नाले सफाई/ खोदाई सन 2022-23 रु. 5 कोटी तरतुदी ऐवजी रु. 10 कोटी करण्यात आली आहे. |
| 16 | अमृत व इतर योजना प्रकल्प अधिकारी व तांत्रिक सल्लागार मानधन व इतर खर्च सन 2022-23 रु. 4 कोटी तरतुदी ऐवजी रु. 8 कोटी करण्यात आली आहे. |

(अरुण कोल्हे)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

(अनिलकुमार पवार)
प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

## प्रपत्र दोन

| | |
|---|---|
| 1 | प्रस्तावाचे वाचन करतांना अर्थसंकल्पातील मुद्रणदोष दुरुस्त करण्यांत आले. याव्यतिरिक्त आणखी काही मुद्रणदोष चुका निदर्शनास आल्यास त्या शुद्धीपत्रकाद्वारे दुरुस्त करण्यात येतील. |
| 2 | विकास कामाव्यतिरिक्त प्रभाग समिती स्तरावरुन केल्या जाणाऱ्या व्यवहारासाठी विविध लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध असणा-या तरतूदी वर सद्दस्थितीत प्रभाग समिती निहाय समप्रमाणात विभागणी करून नियंत्रण ठेवणेत यावे व आवश्यकतेनुसार मा. आयुक्त सो. यांचे निर्देशाने त्या-त्या लेखार्शिषातंर्गत एकूण उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत प्रभागांतर्गत फेरफार करणे विशेष बाब म्हणून अनुज्ञेय राहील. |
| 3 | विकास कामांसाठी निधीची कमतरता व आस्थापना खर्चाची अनुज्ञेय मर्यादा विचारात घेऊन तद्नुसार उत्पन्न व खर्च नियंत्रीत करणेच्या दृष्टीने ठोस प्रयत्न करणेस शिफारस करणेत आली. त्यानुसार विभागप्रमुखांनी योग्य ती दक्षता घ्यावी. |
| 4 | अर्थसंकल्पासोबत सादर केलेल्या सबसीडी अहवालासह इतर सहपत्र तसेच आयुक्त यांनी अंतीमत: मान्य करुन शिफारस केलेल्या लेखाशिर्षनिहाय तरतुदींचा तपशील देखील अर्थसंकल्पाच्या प्रतीत नमुद करणेत आला असून सदर तरतुदी हा या ठरावाचा भाग मानला जाईल. |
| 5 | आगामी वर्षात देखील 5 वर्षाचा मालमत्ता कर आगाऊ भरणाऱ्या मालमत्ता धारकांना मालमत्ता करात 15 % दराने प्रोत्साहनपर सवलत देण्याची तरतुद आहे. परंतू सदर मागणी बीलाचा भरणा हा त्यांनी बिल मिळाल्यापासून 15 दिवसांत करणे आवश्यक आहे. तसेच भविष्यात मालमत्ता करात किंवा इतर करांमध्ये वाढ झाल्यास त्या कराच्या रकमेच्या फरकाचा भरणा मालमत्ता धारकास करावा लागेल. |
| 6 | स्वातंत्र्य सैनिक व आजी माजी सैनिक त्यांच्या पश्चात त्यांची विधवा पत्नी हयात असेपर्यत त्यांच्या राहत्या स्वमालकीच्या अधिकृत निवासी सदनिकेस वेळोवेळीच्या मागणी नुसार मालमत्ता करात 100 % सुट आहे. |
| 7 | नव्याने विकसित केल्या जाणा-या मालमत्तांसाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग योजनेची अंमलबजावणी सक्तीने चालू असून यामुळे नविन इमारतींना रेन वॉटर हार्वेस्टींगची व्यवस्था झाली आहे. त्यामुळे भुगर्भातील पाण्याची पातळी वाढणेस मदत झाली आहे व होत आहे. सबब अस्तित्वात असणाऱ्या सध्याच्या मालमत्तांबाबत महानगरपालिकेच्या संमतीने रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प अंमलात आणणाऱ्या मालमत्ता धारकांना प्रोत्साहन देणेकामी मालमत्ता करामध्ये सामान्य पाणीपट्टीचा भाग समाविष्ट असल्याने मालमत्ता कराच्या 2% सवलतीसह योजना खर्चाच्या 20 % परंतू अधिकतम रु. 1 लक्ष इतका खर्च अनुदान अदा करणेची तरतूद यावर्षी देखील पुढे चालू ठेवण्यात आली आहे. |
| 8 | निसर्ग ऋण प्रकल्प राबविण्यासाठी एकत्रित मालमत्ता कराच्या 2% सवलतीसह योजना खर्चाच्या 20 % परंतू अधिकतम रु. 1 लक्ष इतका खर्च अनुदान अदा करणेची तरतूद यावर्षी देखील पुढे चालू ठेवण्यात आली आहे. |

(अरुण कोल्हे)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

(अनिलकुमार पवार)
प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका